## नियमित दिवाणी दावा क्र.८४/२०२१ मधील निशाणी २० वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना दिनांक ३०.०९.२०२४ रोजी दाव्याचे समन्स तामिल झाले आहे. परंतु, दिनांक २४.१२.२०२४ रोजीपासून नाताळच्या सुट्टया असल्याने त्यांना विहीत मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. हा दावा मालमत्तेशी संबंधित असल्याने त्यांना या कामी त्यांची लेखी कैफियत दाखल करावयाची आहे. सबब, त्यांचेकडून कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे. वादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा अतिक्रमण हटवून दावा मिळकतीचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणेसाठी त्यांना कैफियत सादर करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.१ यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचेकडून कैफियत सादर करणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे व त्यांना त्यांची कैफियत सादर करणेस परवानगी देणेत येत आहे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.01.03 15:13:17 +0530

**दिनांक : ०२.०१.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण : वडवणी** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वडवणी,**

**ता.वडवणी,जि.बीड.**

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 02.01.2025 |
| Transcribed on | : | 02.01.2025 |
| Checked and signed on | : | 03.01.2025 |